# UDID Card

## दिव्यांगत्याचे प्रमाणपत्र व ओळखपत्र UDID

दिव्यांग व्यक्तींना संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र UDID देण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विशेष मोहिम राबविणेबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत दि. 24.12.2021 रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

## अ) स्वावलंबन कार्डचे (UDID CARD) फायदे :

1. या प्रणालीमध्ये प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला नोंदणीकृत असा युनिक क्रमांक देऊन, सदर स्वावलंबन कार्ड दिव्यांगत्वाचे लाभ मिळण्यासाठी संपूर्ण देशामध्ये ग्राहय धरण्यात येते.
2. केंद्रीयकृत वेब पोर्टलद्वारे संपूर्ण देशभरात दिव्यांग व्यक्तींच्या डेटाची ऑनलाइन उपलब्धता असेल.
3. केंद्रीयकृत वेब पोर्टलद्वारे उपलब्ध असलेला दिव्यांग व्यक्तींचा डेटा सरकारच्या विविध नियोजन प्रक्रियेस मदत करेल.
4. शासकीय रुग्णालये / वैद्यकीय मंडळाद्वारे दिव्यांगत्वाच्या टक्केवारीची गणना करण्यासाठी त्वरीत मूल्यांकन प्रक्रिया उपलब्ध आहे.
5. दिव्यांग व्यक्तींच्या डेटाची नक्कल करण्यात येत नाही.
6. दिव्यांग व्यक्तीद्वारे किंवा त्यांच्या वतीने दिव्यांग प्रमाणपत्राचे ऑनलाईन नूतनीकरण आणि माहिती अद्ययावत करणे सोपे होते.
7. दिव्यांग व्यक्तींच्या डेटाची विविध प्रकारे आवश्यकतेनुसार एम. आय. एस. रिपोर्टिंग फ्रेमवर्कमध्ये करणे सोपे होते.
8. दिव्यांग व्यक्तीकरिता सरकारने सुरु केलेल्या विविध योजनांच्या कार्यक्षमतेसह प्रभावी व्यवस्थापन करणे सोपे होते.
9. भविष्यात अतिरिक्त शोधल्या गेलेल्या दिव्यांगाची काळजी घेणे सोपे होईल.
10. अति तीव्र प्रकारच्या दिव्यांग व्यक्तिकरिता सहज दिव्यांग प्रमाणपत्र मिळेल.
11. अध्ययन अक्षम, ऑटिझम यासारख्या दिव्यांग बालकांना या कार्यक्रमाचा लाभ मिळेल.
12. यूडीआयडी सिस्टम विविध श्रेण्यांनुसार डेटाची देखभाल करते. प्राप्त झालेला डेटा शासनाच्या विविध नियोजन प्रक्रियेस मदत करेल.






### अंजनगाव सुजी येथे दिव्यांग तपासणी शिबिर संपन्न

दिव्यांग शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

>मनोज मेळे>
अंजनगाव सुर्जी (ता.प्र.)

जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती, पंचायत समिती व ग्रामीण रुग्णालय अंजनगाव सुजी च्या संयुक्त विद्यमाने आज 28 मार्च रोजी अंजनगाव सुर्जी ग्रामीण रुग्णालयात दिव्यांग तपासणी शिबिराचे आयोजन व प्रमाणपत्राचे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

स्थानिक ग्रामीण रुग्णालयात दिव्यांग तपासणी शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला असून शहर व ग्रामीण भागातील दिव्यांग सदर शिबिराला तपासणी करिता उपस्थित होते. सदर दिव्यांग तपासणी शिबिरात अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. यामध्ये सर्व वैद्यकीय अधिकारी डॉ. चिन्मय बुर्जक, फिजिशियन,डॉ. शशिकांत फसाटे, डॉ. अभिजीत चारथळ,अस्थिव्यंग तज्ञ डॉ. गुरुप्रकाश खोब्रागडे, डॉ. स्वाती सोनोने (मनोविकार तज्ञ) डॉ. दीप्ती हरले मनोविकार तज्ञ, प्रमोद भकते (मानसिक विभाग दिव्यांग विभाग) अजय सोळंके, सामाजिक सेवा अधीक्षक, कविता सोळंके फीजीओ थेरपीस्ट, डॉ.मुनाल इरले, भावना पुरोहित आणि श्रद्धा हरकंचे (चिकित्सालयीन मानसशास्त्र), अमोल भातकुलकर, सचिन टवलारे ,सुशांत बडगे (ई.एन्टी विभाग)निलेश ढेमळे , वैभव काठोळे, अंजनगाव सुर्जी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विनोद खेडकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नालट, तालुका वैद्यकीय अधिकारी सुधीर डोंगरे, डॉ. तरुण पटेल, डॉ.साकिब, संदीप पाटील, अजय थेडे, चोरपगार ,अमोल राऊत, धोटे ,विशाल हंतोडकर, ग्रामीण रुग्णातील कर्मचारी यांच्यासह पंचायत समिती मधील कर्मचारी, शिक्षक सहभागी झाले होते.

शिबिरात दिव्यांगांच्या ऑनलाईन नोंदणी, तपासणी, दिव्यांगाचे प्रमाणपत्र इत्यादी कार्यक्रम शिबिरात आयोजित करण्यात आले होते. शिबिराला दिव्यांगांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. सदर शिबिराचे नियोजन अंजनगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विनोद खेडकर, वैद्यकीय अधीक्षक प्रमोद नालट, तालुका वैद्यकीय अधिकारी सुधीर डोंगरे, प्रमोद भकते दिव्यांग विभाग सामान्य रुग्णालय अमरावती यांनी केले.

दिव्यांग बांधवांनी सदर तपासणी शिबिराचा लाभ घेतला.

## ब) दिव्यांग व्यक्तींना वैश्विक ओळखपत्र (UDID) मिळण्यासंबधीच्या पायऱ्या

- दिव्यांग व्यक्तींना स्वगृही इंटरनेटची सुविधा उपलब्ध असल्यास सदरील ऑनलाईन अर्ज करता येतो. तसेच सुविधा केंद्र (Common Service Centre - CSC) केंद्रमध्ये अल्प मोबदला देवून ऑनलाईन अर्ज भरता येतो.
- तसेच जिल्ह्याच्या जिल्हा सामान्य रुग्णालय / शासकीय वैद्यकीय महाविदयालय यांना देण्यात आलेल्या युजर लॉगीन आयडीद्वारे सुध्दा हा ऑनलाईन अर्ज भरता येतो.
- सदरील ऑनलाईन अर्ज संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा शल्य चिकित्सक / अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविदयालय, यांच्या लॉगीन आयडी वर उपलब्ध होतो.
- संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक/अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविदयालयातील अधिकारी/कर्मचारी सदरील ऑनलाईन अर्जाची पडताळणी (Verification) करतात.
- पडताळणी केलेला ऑनलाईन अर्ज संबंधित दिव्यांगत्वाचे मुल्यांकन (Assessment) करणारे तज्ज्ञांकडे पाठविला जातो. संबंधित तज्ज्ञ त्या दिव्यांग लाभार्थ्याची मुल्यांकन (Assessment) करुन केलेले मुल्यांकन ऑनलाईन संकेतस्थळावर अद्ययावत करतो.
- सदरील ऑनलाईन अर्ज संबंधित रुग्णालयाच्या दिव्यांग वैद्यकीय मंडळाकडे वर्ग होतो. दिव्यांग वैद्यकीय मंडळाने दिलेले निर्देश ऑनलाईन संकेतस्थळावर अद्ययावत केल्यानंतर सदरील दिव्यांग लाभार्थ्याला वैश्विक ओळखपत्र व दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र ऑनलाईन उपलब्ध होते.
- जिल्हा शल्य चिकित्सक / अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविदयालय यांचे कार्यालयाकडून ऑनलाईन जनरेट केलेल्या वैश्विक ओळखपत्र महाराष्ट्र राज्यासाठी नेमलेल्या प्रिंटिंग एजन्सीकडें ऑनलाईन हस्तांतरीत केले जाते.
- प्रिंटिंग एजन्सीद्वारे वैश्विक ओळखपत्रे संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात येतात आणि सदर कार्यालयांमार्फत संबंधित दिव्यांग लाभार्थ्यांना ही ओळखपत्रे वितरित केली जातात.





# दिव्यांग सहाय्यता कक्ष






## जिल्हास्तरीय दिव्यांग सहाय्यता कक्ष समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद अमरावती

कोरोना काळामध्ये ग्रामीण तसेच मेळघाट क्षेत्रातील दुर्गम भागामध्ये वास्तव्य करणाऱ्या दिव्यांग बांधवांना किराणा, औषधे तसेच जीवनावश्यक वस्तू उपलब्ध होण्यास अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर दिव्यांग विभाग जिल्हा परिषद अमरावती कार्यालयामार्फत जिल्हास्तरीय दिव्यांग सहायता कक्ष स्थापन करण्यात आला. यामध्ये कार्यालयीन कर्मचारी, दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक /शिक्षकेतर कर्मचारी यांचा समावेश होता. तसेच ग्रामीण स्तरावर अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, आशा वर्कर यांचा सहभाग होता. कक्षासाठी हेल्पलाइन नंबर जाहीर करण्यात आला. या हेल्पलाइन नंबर वर संपर्क साधणाऱ्या निराधार व गरजू दिव्यांग बांधवांना त्यांचे मागणीप्रमाणे किराणा, औषधे, जीवनावश्यक वस्तू आणि सेवा उपलब्ध करून देण्यात आली. यासाठी अमरावती शहरातील दानशूर व्यक्ती स्वयंसेवी संघटना, शासकीय अधिकारी/ कर्मचारी, दिव्यांग शाळेचे संस्थाप्रमुख, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांनी सढळ हाताने सहकार्य केले या सर्वांच्या योगदानामुळे कोरोना सारख्या आणीबाणीच्या प्रसंगी निराधार दिव्यांग बांधवांना मदत सेवा उपलब्ध होऊ शकली









# शाळांमधील नाविन्यपुर्ण उपक्रम

## ॲक्यूप्रेशर आणि मसाज सेंटर

आश्रित अंध कर्मशाळा अमरावती येथे ॲक्यूप्रेशर अँड मसाज थेरेपी हा अभ्यासक्रम चालविला जातो. अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी ॲक्यूप्रेशर अँड मसाज सेंटर चालवितात आणि स्वतः आपला रोजगार मिळवतात. या संस्थेच्या आवारामध्ये 2010 पासून ॲक्युप्रेशर अँड मसाज सेंटर व्यवस्थापकीय अधीक्षक श्री पंकज मुदगल यांचे मार्गदर्शनाखाली सुरु आहे...







## पॉलिहाऊस

प्रयास विशेष शाळा अमरावती या शाळेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना भाजीपाला लागवड आणि भाजीपाला विक्री यासाठी पॉलिहाऊस तयार करण्यात आले आहे. तसेच भाजीपाला विक्री केंद्र शाळेच्या आवारामध्ये सुरु करण्यात आलेले आहे शहरांमध्ये भाजीपाला विक्री करण्यासाठी स्वतंत्र वाहन उपलब्ध करुन देण्यात आले आहे.













## हाय स्पीड संगणकृत ब्रेल प्रेस



राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था अमरावती (नॉफ) या संस्थेमध्ये दृष्टी बाधित असलेल्या विद्यार्थ्यांसाठी जुलै 2019 पासून हाय स्पीड संगणकृत ब्रेल प्रेस ची स्थापना करण्यात आली आहे. इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची क्रमिक ब्रेल पुस्तके तसेच नवनीत प्रकाशनाच्या मार्गदर्शिका आणि अध्यापन पुस्तिका वर्कबूक प्रश्नसंच तसेच श्री गजानन महाराज विजय ग्रंथ, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आत्मचरित्र, नवीन शैक्षणिक धोरण 2020 बुद्ध और उनका धम्म, श्री हनुमान चालीसा, पसायदान व मनाचे श्लोक इत्यादी पुस्तके आणि लेखन साहित्य ब्रेल लिपीमध्ये मुद्रित केले आहे आणि दृष्टि बाधित विद्यार्थ्यांना निशुल्क प्रदान केली जात आहेत.

श्री हनुमान चालीसा या अध्यात्मिक ब्रेल मुद्रित पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच माननीय आमदार श्री रवी राणा यांच्या शुभहस्ते करण्यात आले आहे.




## स्पीच थेरपीस्ट सेंटर

श्री बुलिदान राठी मूकबधिर विद्यालय, साईनगर, अमरावती या शाळेमध्ये COCHLER IMPLANT झालेल्या मुलांसाठी भाषा विकासाच्या दृष्टीने स्पीच थेरपीस्ट सेंटर हा नवीन उपक्रम राबविण्यात येत आहे सर्जरी झालेल्या मुलांना भाषा विकासाच्या दृष्टीने या शाळेमध्ये भाषा विकास करुन घेतला जातो या उपक्रमातील अनेक विद्यार्थी नॉर्मल इंग्रजी शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत.





# अंबा फेस्टिवल

अंबा फेस्टिवल हा उपक्रम भारताच्या प्रथम महिला राष्ट्रपती मा. सौ. प्रतिभाताई पाटील यांच्या सन्मानार्थ 2007 सालापासून अमरावती शहरांमध्ये सुरु करण्यात आला आहे.. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आनंद यात्री या दिव्यांगांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन डॉ. बबन बेलसरे यांच्या पुढाकाराने करण्यात येते. यामध्ये जिल्ह्यातील सर्व दिव्यांग शाळेतील विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी होतात . दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी हे एक मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.












# 3 डिसेंबर - जागतिक दिव्यांग दिनानिमित्त भव्य रॅलीचे आयोजन

3 डिसेंबर 2022 रोजी जागतिक दिव्यांग दिनानिमित्त अमरावती शहरांमध्ये भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास हार अर्पण व अभिवादन करुन झाली. या दिव्यांग रॅलीला मा. श्री अविशांत पांडा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती आणि मा. श्री सुनील वारे ,प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती यांचे हस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. या रॅलीमध्ये अमरावती शहरातील दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांनी आकर्षक वेशभूषा द्वारे पथकाद्वारे, आणि घोषवाक्य द्वारे दिव्यांग जनजागृती पर कार्यक्रम सादर केले. दिव्यांग विद्यार्थ्यांनी काढलेल्या या रॅलीचे अमरावती शहरातील नागरिकांनी अतिशय मनापासून स्वागत करुन कौतुक केले. रॅलीची सांगता सामाजिक न्याय भवन, अमरावती या ठिकाणी झाली. यानंतर विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम आणि मान्यवरांचे मार्गदर्शनपर कार्यक्रम पार पडला.













# 3 डिसेंबर – जागतिक दिव्यांग दिनानिमित्त भव्य रॅलीचे आयोजन




















# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव 2023

अमरावती जिल्ह्यातील दिव्यांग शाळा मधील मुला-मुलीच्या क्रीडा व सांस्कृतिक सोहळा दि. 18 व 19 जानेवारी 2023 रोजी निवासी मूकबधिर विद्यालय, टोंगलापूर फाटा, मासोद, तालुका चांदुर बजार या शाळेमध्ये संपन्न झाला. यामध्ये जिल्ह्यातील सुमारे साडेचारशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन मा. श्री सुनील वारे, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग अमरावती यांच्या हस्ते दिनांक 18 जानेवारी 2023 रोजी संपन्न झाले उद्घाटनाचा सोहळा अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. यावेळी ध्वजारोहण करण्यात आले, खेळाडूंची मार्च पासिंग झाले राज्यांत क्रीडाजोत प्रज्वलित करण्यात आली आणि रंगीबिरंगी फुगे आकाशात सोडण्यात आले. अतिशय उत्साहामध्ये या स्पर्धेची सुरुवात झाली.

दिनांक 18 आणि 19 जानेवारी या दोन दिवसांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने आणि आनंदाने क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदविला दिनांक 18 जानेवारी रोजी सायंकाळी विद्यार्थी आणि शिक्षक कर्मचारी यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवला. श्री आमले सर आणि श्री गोरे सर यांचे प्रभावी सूत्रसंचालन आणि शेरोशायरी, किस्से यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये उत्साहाचे वातावरण तयार झाले. यामध्ये मराठी हिंदी गाण्यावर नृत्य नाटिका इत्यादींचा समावेश होता.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ दिनांक 18 जानेवारी रोजी दुपारी दोन वाजता माननीय श्री संतोष जोशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी वैयक्तिक आणि सामूहिक प्रवर्गामध्ये विजेत्या खेळाडूंना आणि संघांना प्रमाणपत्र आणि बक्षिसे वितरित करण्यात आली. मा. जोशी सरांनी यावेळी खेळाडूंना मार्गदर्शन केले. एकूणच दोन दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अतिशय उत्साहाने, आनंदाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.







# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव 2023





















# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव 2023



















# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव 2023














## HVPM येथे राज्य स्तरीय क्रीडा स्पर्धा पूर्व प्रशिक्षण










## कोरोना काळातील ऑनलाइन दिव्यांग शिक्षण
















# मुला मुलींच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा 2023.



महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील दिव्यांग मुला-मुलींच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा 14 फेब्रुवारी ते 16 फेब्रुवारी 2023 या कालावधीमध्ये शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे बालेवाडी, पुणे येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमधून विजेते 141 विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या अगोदर तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या राज्यस्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेमध्ये दरवर्षीप्रमाणे अमरावतीच्या अंधप्रवर्गाला राज्यस्तरीय सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त झाले. तसेच मतिमंद, मूकबधिर, अस्थिवंग, आणि बहु विकलांग प्रवर्गातील मुला मुलींनी अतिशय नेत्रदीपक कामगिरी करुन अव्वल स्थान पटकाविले. महाराष्ट्रामध्ये दिव्यांग क्रीडा क्षेत्रामध्ये अमरावती जिल्ह्याचा नावलौकिक निर्माण झाला आहे.











